M15/1/AXMAR/SP1/MAR/TZ0/XX

Diploma Programme
Programme du diplôme
Programa del Diploma

# Marathi A: literature – Standard level – Paper 1
# Marathe A : littérature – Niveau moyen – Épreuve 1
# Marathi A: literatura – Nivel medio – Prueba 1

Friday 8 May 2015 (afternoon)
Vendredi 8 mai 2015 (après-midi)
Viernes 8 de mayo de 2015 (tarde)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

---

### Instructions to candidates

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a guided literary analysis on one passage only. In your answer you must address both of the guiding questions provided.
- The maximum mark for this examination paper is **[20 marks]**.

### Instructions destinées aux candidats

- N’ouvrez pas cette épreuve avant d’y être autorisé(e).
- Rédigez une analyse littéraire dirigée d’un seul des passages. Les deux questions d’orientation fournies doivent être traitées dans votre réponse.
- Le nombre maximum de points pour cette épreuve d’examen est de **[20 points]**.

### Instrucciones para los alumnos

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un análisis literario guiado sobre un solo pasaje. Debe abordar las dos preguntas de orientación en su respuesta.
- La puntuación máxima para esta prueba de examen es **[20 puntos]**.

2215–0599

3 pages/páginas

© International Baccalaureate Organization 2015

International Baccalaureate
Baccalauréat International
Bachillerato Internacional

कोणत्याही **एका** उता-याचे मार्गदर्शक प्रश्नांच्या आधारे वाङ्मयीन विश्लेषण लिहा. उत्तर लिहिताना दोन्ही मार्गदर्शक प्रश्न लक्षात घेणे आवश्यक आहे.

**1.**

## नामुष्की

नंतर एकदा असाच मी स्कूटरवरून चाललेलो असताना रस्त्याने माझ्या शेजारी राहणारी एक स्त्री पायी चाललेली होती व ती मी चाललो होतो त्याच दिशेने म्हणजे तिच्या घराकडेच चाललेली होती तेव्हा स्कूटर थांबवून सभ्यपणे मी तिला विचारले की आपणास घरीच जायचे आहे तर बसा मागे. त्यावेळी दुनियेतले सारे आश्चर्य स्वत:भोवती गोळा करीत व त्यातले शक्य ते सगळे आपल्या चेह-यावर ओतत ती म्हणाली, कोण? मी? छे छे! त्यामुळे विलक्षण शरमून मी स्कूटर चालू केली आणि स्वत:शी भाषण स्कूटरच्या आवाजात व वा-याच्या ओघात पुष्कळ सोडून दिले की, हे स्त्रिये! मी काही तुझ्या अब्रूवर घाला घालण्यासाठी हा प्रस्ताव दिलेला नव्हता किंवा मला तुझ्यावर लाईन मारायची नव्हती आणि त्याप्रकारचा कोणत्याही दर्जाचा पूर्वेतिहास मला नाही, हे माझ्या शेजारी राहात असल्याने तुला माहीत आहे. त्यामुळे मी तर साधी एक आपली माणुसकी; की बुवा आपण स्कूटरवर चाललो आहोत आणि आपल्या शेजारी राहणारी महिला पायी चाललेली आहे तर एक मध्यमवर्गीय सभ्यता म्हणून विचारणा केली तेव्हा आपली अब्रू लुटली जात असल्याचा बहाणा; हे स्त्रिये! तू का करावास किंवा तसे तुला करावे लागावे असा कोणता धाक तुझ्या पुरुषाने तुला घातला? की मी तुला सगळ्या पूर्वेतिहासासकट इतका चरित्रहीन इसम वाटलो की मी एखाद्या स्त्रीशी बोललो असता तिला कौमार्यभंगाच्या दर्जाचे दु:ख व्हावे? याच्याआधी कितीतरी वेळा असे पाठीशी बसवून आणले त्यावेळी हे माझ्या डोक्यातही आले नाही इत्यादी. पुन्हा एकदा असाच मी बसच्या गर्दीत वर चढत असताना एका हातात बॅग व दुसरा हात कुठेतरी धरायची धडपड करीत असताना आपल्या खिशात पैशांचे पाकीट असून त्यात सुमारे एक हजारावर रुपये आहेत याचे अधूनमधून मला भान होते तेव्हा वर घुसलो आणि खिशात हात घातला तर पाकीट गहाळ झाल्याचे माझ्या लक्षात आले व आयुष्यात पहिल्यांदाच हे असे झाल्यामुळे मी इतका स्तंभित झालो की खूप वेळ काहीच सुचेना आणि खिशात वेगळे पैसेही नव्हते. त्यामुळे खाली उतरण्याखेरीज इलाजही राहिला नाही आणि त्या गावाहून आपल्या गावी यायचे कसे असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला तसेच पोलिस 20स्टेशनात जाऊन पोलिसांना ही नामुष्कीची गोष्ट सांगायची कशी अथवा त्या अनोळखी गर्दीत भाड्यासाठी कोणाकडे पैसे मागायचे अशी दुर्धर स्थिती झाली तेव्हा मी आसपासशी माणसे बघत राहिलो की बुवा यातल्या कोणी माझे पाकीट मारले असेल, तर सगळे लोक इतके मासूम की हे कोणाच्याच गावी नव्हते आणि हे सरळच की ज्याने ते मारले असणार तो तिथे असण्याचे काहीच कारण नव्हते आणि मी स्वत:शी म्हणत होतो की, अरे! तुमच्या जगण्याविषयी ज्याला सहानुभूती आहे अशा माझ्यासारख्या माणसाचेच पाकीट मारून तुम्ही तुमचा एक सहानुभूतीदार गमावत आहात, तुमची तरफदारी आता करणार कोण? मलाच तुम्ही असा उलटा धडा शिकवलात, माझा भलेपणावरचा विश्वासच गेला आहे आणि तुम्हीच जबाबदार आहात इत्यादी.

रंगनाथ पठारे, *नामुष्कीचे स्वगत* (१९९९)

(अ) वरील उता-यात निवेदकाच्या बाबतीत घडलेले प्रसंग आणि त्यांतून सूचित होणारा अर्थ यांतील संगती स्पष्ट करा.

(ब) वरील उता-यात उपयोगात आणलेल्या निवेदनतंत्राबाबत काय म्हणता येईल?

**2.**

**रानांतली अंगाई**

झोपडीच्या झापाम्होरं,
कसं चांदणं टिप्पूर

वा-यासंगं हेलावतो,
उभ्या चिंचेचा मोहोर

सभोंवार काळं रान,
गेलं दुधांत भिजून

रानवेलींचीं लेकरं,
त्यास चाटती निजून.

उगड्या गव्हाणीशीं
बैल करीती रवंथ

करी रानाची राखण,
मोत्या जागत, पैंगत.

बाळा, दमून भागून
तुझं वडील झोपलं

नको किरकीर
झोप उगीच मोडल.

ग. दि. माडगूळकर, *जोगिया* (१९५६)

(अ) एक “अंगाई गीत” म्हणून वरील कवितेतील तुम्हांला अपेक्षित व अनपेक्षित आशयाची चर्चा करा.

(ब) वन्य जीवनाशी सुसंगत अशा प्रतिमांचा वापर कवीने कसा केला आहे ?